# नवराष्ट्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी साधला पोलिसांशी मनमोकळा संवाद

**पिंपरी** – क्विक हील फाउंडेशन आणि पंख संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जीवनमूल्य प्रशिक्षण प्रकल्पा अंतर्गत पिंपरी येथील नवराष्ट्र महाविद्यालयातील इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी पोलिसांशी थेट भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा विषय बाल लैंगिक अत्याचार व पॉक्सो कायदा असा होता. या माध्यमातून मुला-मुलींना लैंगिक अत्याचार व पॉस्को कायद्याविषयी जनजागृती करण्यात आली. मुलांनी मनमोकळेपणे पोलिसांशी संवाद साधला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्ञानोबा निकम, महिला पोलीस शिपाई सुप्रिया पारसे व पोलीस शिपाई संदीप ओझरकर उपस्थित होते. नवराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य उत्तम पाटील, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे तसेच पंखचे समुपदेशक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी पोलिसांशी संवाद साधला व आपल्या मनातील विविध प्रश्न विचारले.

प्रभात Mon, 07 January 2019
epaper.eprabhat.net/c/3556